# लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये २३ मार्च १९३१(शहीद दिनाचे) ९२ वावे पुण्यस्मरण.



सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है
देखना है जोर कितना बाज़ू-ए-क़ातिल में है||२||

भारतीय क्रान्तिकारी बिस्मिल अज़ीमाबादी द्वारा लिखित या शायरी ने प्रेरित होऊन २० ते २५ वर्ष वयाचे तीन हुतात्मे देशासाठी हसत हसत फाशीच्या शिक्षेला सामोरे गेले. त्या क्रांतिवीरांच्या स्मरणार्थ लोक मंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले लोकमंगल संस्थेचे प्राचार्य माननीय योगेश गायकवाड सर यांच्या निर्देशानुसार शहीद दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पद माननिय निदेशिका कोरे मॅडम यांनी भूषवले तसेच कार्यक्रमाच्या प्रमूख पाहुण्या म्हणून व्यासपीठावर लोकमंगल आय.टी.आय.च्या निदेशिका माननिय संध्याराणी शिंदे मॅडम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निदेशक श्री संभाजी जाधव सर यांनी केले, तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांची ओळख करून दिली. त्याचप्रमाणे निदेशक श्री संभाजी जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली विजतंत्री द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी शहीद दिनाचे रेखाटले होते त्या चित्राचे अनावरण करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय कोरे मॅडम यांनी शहीद भगतसिंग सुखदेव आणि राजगुरू यांच्या क्रांतिकारक आयुष्यावर प्रकाश टाकणारे व्याख्यान दिले, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या संध्याराणी शिंदे मॅडम यांनी आयटीआयच्या विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार तसेच स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी स्वतः स्वतःसाठी करावे लागणारे नियोजन या विषयावर व्याख्यान दिले सदर कार्यक्रमास ८५ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. निदेशक श्री रमेश लवटे सर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप केला. तसेच कार्यक्रमाच्या संपन्नतेसाठी सौरभ दहीटनकर सर यांनी विशेष योगदान दिले.